RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ११९ (३)] मंगळवार ऑगस्ट ४, २०२६/श्रावण १३, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४२५**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ ऑगस्ट, २०२६.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०२५/प्र.क्र.२०३/मुद्रांक-२.— महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, (१९५८ चा ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्याने, याद्वारे, महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असलेला भारतीय सशस्त्र दलांचा सैनिक किंवा अधिकारी जो, युद्ध, युद्ध-सदृश्य परिस्थिती, सैनिकी हालचाली, दहशतवादविरोधी कारवाई किंवा विद्रोहरोधी कारवाईमध्ये मृत झाला आहे याची विधवा किंवा कायदेशीर वारसाच्या नावाने भोगवटा मूल्य व्यतिरिक्त व लिलावाव्यतिरिक्त शासनाद्वारे वाटप केलेल्या शेतजमिनीच्या बाबतीत निष्पादित करावयाच्या अभिहस्तांतरणाच्या किंवा भाडेपट्ट्याच्या पहिल्या संलेखावरील उक्त अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूची-एकच्या अनुच्छेद २५च्या खंड (ब) व अनुच्छेद ३६ अन्वये अन्यथा आकारण्यायोग्य असलेले संपूर्ण मुद्रांक शुल्क, पुढील शर्तीस अधीन राहून, माफ करीत आहे :—

**शर्ती.—**

(१) शासनाद्वारे, महसूल व वन विभागाची अधिसूचना, दिनांक २८ जून, २०१८ किंवा त्या अनुषंगाने काढलेला शासन निर्णय किंवा आदेशान्वये शेतजमीन वाटप केली जाईल.

(२) लाभार्थी हा मयत सैनिक किंवा अधिकाऱ्याची विधवा किंवा कायदेशीर वारस असेल व असा दर्जा सक्षम प्राधिकरणाद्वारे प्रमाणित केलेला असेल.

(३) सक्षम प्राधिकरण असे प्रमाणित करील की, मयत सैनिक किंवा अधिकारी,—

(अ) महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी होता; आणि

(ब) युद्ध, युद्ध-सदृश्य परिस्थिती, सैनिकी हालचाली, दहशतवादविरोधी कारवाई किंवा विद्रोहरोधी कारवाईमध्ये मृत झालेला आहे.

( ४ ) सूट ही अशा शेतजमिनीच्या वाटपाकरिता निष्पादित करावयाच्या केवळ पहिल्या संलेखाच्या बाबतीत उपलब्ध असेल.

( ५ ) जमिनीचे ज्या प्रयोजनासाठी वाटप केले आहे त्याकरिता तिचा काटेकोरपणे वापर केला जाईल.

( ६ ) जर या अधिसूचनेन्वये, कोणत्याही लाभार्थ्याने, तथ्ये दडपणे, विपर्यास करणे, किंवा वाटपाच्या कोणत्याही शर्तीचा भंग करणे याद्वारे, मुद्रांक शुल्कातील सूट मिळविली असेल तर ती सूट सुरुवातीपासूनच काढून घेतली जाईल आणि अशा लाभार्थ्यास, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, ( १९५८ चा ६० ) अन्वये आकारण्यायोग्य असलेल्या शास्तीसह मुद्रांक शुल्क कोणतेही असल्यास, प्रदेय असेल.

**स्पष्टीकरण.—**

( १ ) “कायदेशीर वारस” याचा अर्थ, लागू असलेल्या कायद्यानुसार व शासनाच्या धोरणानुसार सक्षम प्राधिकरणाने मयत सैनिकाचा किंवा अधिकाऱ्याचा कायदेशीर वारस म्हणून मान्यता दिलेली व्यक्ती, असा आहे.

( २ ) “सैनिक व अधिकारी” याचा अर्थ, भारतीय सशस्त्र दलांत कार्यरत असलेली व्यक्ती, असा आहे.

( ३ ) युद्ध, युद्ध-सदृश्य परिस्थिती, सैनिकी हालचाली, दहशतवादविरोधी कारवाई किंवा विद्रोहरोधी कारवाईमध्ये मृत्यूची घटना, शासनाद्वारे, विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सशस्त्र दलांच्या सक्षम प्राधिकरणाद्वारे किंवा अशा प्राधिकरणाद्वारे प्रमाणित केली जाईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 4th August, 2026.

### Order

Maharashtra Stamp Act.

No.Mudrank-2025/C.R.203/Mudrank-2.— In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits the stamp duty in whole, as otherwise chargeable under clause (*b*) of article 25 and article 36 of Schedule-I appended to the said Act on the first instrument of Conveyance or Lease executed in respect of agricultural land allotted by the Government, without occupancy price and without auction, in favour of the widow or legal heir of a soldier or officer of the Indian Armed Forces who was domiciled in the State of Maharashtra and who died in war, war-like situation, military operation, anti-terrorist operation or anti-insurgency operation, subject to the following conditions, namely :—

*Conditions.—*

(1) The agricultural land shall be allotted by the Government under the Revenue and Forest Department Notification dated the 28th June 2018 or any Government Resolution or Order issued in continuation thereof.

(2) The beneficiary shall be the widow or legal heir of the deceased soldier or officer and such status shall be certified by the Competent Authority.

(3) The Competent Authority shall certify that the deceased soldier or officer

(a) was domiciled in the State of Maharashtra; and

(b) died in war, war-like situation, military operation, anti-terrorist operation or anti-insurgency operation.

(4) The remission shall be available only in respect of the first instrument executed for allotment of such agricultural land.

(5) The land shall be used strictly for the purpose for which it is allotted.

(6) If any beneficiary has obtained remission under this notification by suppression of facts, misrepresentation, or commits breach of any condition of allotment, the remission shall stand withdrawn *ab-initio* and the stamp duty together with penalty, if any, recoverable under the Maharashtra Stamp Act (LX of 1958), shall become payable.

*Explanation.—*

(1) “Legal heir” means the person recognised as the legal heir of the deceased soldier or officer by the Competent Authority in accordance with the applicable law and Government policy.

(2) “Soldier or Officer” means a person serving in the Indian Armed Forces.

(3) The fact of death in war, war-like situation, military operation, anti-terrorist operation or anti-insurgency operation shall be certified by the Competent Authority of the Armed Forces or by such authority as may be specified by the Government.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.